| | |
|---|---|
| **MHLA160000252015** | **नियमित फौजदारी खटला क्र.०३/२०१५**<br>**शासन वि. सुभाष व ईतर** |

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रकरण हे दहा वर्षे जुने आहे परंतु आरोपी क्र.६ व ७ हे गैरहजर आहेत आणि त्यांचे विरुध्द गैरजमानती वॉरंटची बजावणी होत नाही. त्यामुळे प्रकरण विनाप्रगती प्रलंबित आहे. त्याकरिता संबंधीत पोलीस हे जबाबदार आहेत. त्यामुळे आरोपींना गैरजमानती वॉरंटची बजावणी करण्यासाठी उप–विभागीय पोलीस अधिकारी उदगीर यांना वॉरंट पाठवणे योग्य ठरेल. सबब, आरोपी क्र.६ व ७ यांच्या विरुध्द गैरजमानती वॉरंट काढून उप–विभागीय पोलीस अधिकारी उदगीर यांच्याकडे बजावणीकरिता पाठवावेत.

०२. आदेश संगणकावर टंकलिखीत केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.07.01 15:31:27 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ०१–०७–२०२५**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**